जा.क्र.स्थागुअशा/प्रेस नोट / २६९ /2021

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग

दिनांक :- 29.01.2021

# प्रेस नोट

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग कडून गोवा बनावटीची वाहतुक करणाऱ्या बोलेरो पिकअप वाहनासह ११ लाखाची दारु जप्त

मा. श्री. राजेंद्र दाभाडे, पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवैध गोवा बनावटीची दारु वाहतुक व विक्री विरोधात कारवाईसाठी मोहीम आखण्यात आली आहे.

त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल धनावडे, सहा. पोलीस निरीक्षक, श्री. बी. ए. सुतार यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथक नेमण्यात आलेले होते. दि.29.01.2021 रोजी श्री.सचिन शेळके, पोलीस उपनिरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग हे स्टाफसह कणकवली पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. सकाळी 11:30 वाजताचे दरम्याने ते हळवल रेल्वे फाटकानजिक आले असता कळसुलीकडून कणकवली कडे येणारी एक बोलेरो पिकअप गाडी दिसली, त्या गाडीबाबत संशय आल्याने तीला थांबवून त्या गाडीचे चालकाकडे गाडी व मालाबाबत चौकशी केली असता तो विसंगत माहीती सांगू लागला. त्यामुळे वाहन व वाहनातील मालाबाबत खात्री करण्यासाठी ते वाहन कणकवली पोलीस ठाणे येथे आणली. त्या वाहनातील मालाबाबत खात्री केली असता त्या वाहनात गोवा बनावटीची विनापरवाना दारु मिळून आली.

सदर बोलेरो पिकअप वाहन क्र.MH-46-BM-2420 या वाहनाचे मागील हौद्याचे शटर कुलूप काढून उघडले असता शटरच्या बाजूला प्लास्टीकचे क्रेट रचून ठेवलेले होते व त्याच्या मागे आतमध्ये गोवा बनावटीच्या विविध प्रकारच्या दारुचे भरलेले बॉक्स होते. सदर दारुमध्ये REALS WHISKY, GOLDEN FINE WHISKY, McDowells No.1 ORIGINAL अशा विविध प्रकारच्या विनापरवाना गोवा बनावटीच्या दारुचे 225 बॉक्स मिळून आले. सदर दारुची किंमत 11,58,300/- रुपये (अकरा लाख अठ्ठावन्न हजार तीनशे रुपये) एवढी असून बोलेरो पिकअप गाडीची किंमत 7,00,000/- रुपये (सात लाख रुपये) एवढी आहे. दारु व गाडीसह मिळून 18,58,300/- रुपये (अठरा लाख अठ्ठावन्न हजार तीनशे रुपये) किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आलेला असून 1)पांडुरंग दयानंद कदम, रा.चिपळूण, वालोपे, बेंडकरवाडी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी 2)राजेंद्र मधुकर महाकाळ, रा.संगमेश्वर, वाडा वेसराळ, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदरबाबत कणकवली पोलीस ठाणे गु.र.नं.28/2021, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम 65(अ), (ई), 81, 83 प्रमाणे दि.29.01.2021 रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पोलीस उपनिरीक्षक- श्री.सचिन शेळके, पोलीस अंमलदार प्रकाश कदम, चंद्रकांत पालकर, ज्ञानेश्वर कांदळगांवकर, रवि इंगळे, चंद्रहास नार्वेकर, आशिष गंगावणे यांनी सहभाग घेतला.

(बी. ए. सुतार)
सहाय्यक पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग

प्रति,

मा. जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग

5.30 PM

29/1/2021